# Quadrant II – Notes

**Programme:** BA

**Subject:** Marathi

**Paper Code:** MRC-106

**Paper Title:** **Marathi Grammar (मराठी व्याकरण)**

**Unit:** **शब्दविकरण विचार**

**Module Name**: प्रयोगविचार

**Module No:** 20

**Name of the Presenter: Dr. Geeta Yerlekar**

---

## मराठीतील प्रयोगविचार

प्रयोगविचार हा व्याकरणातील एक महत्त्वाचा घटक आहे. या घटकाच्या अनुशंगाने प्रयोगासंदर्भातील व्याख्या व प्रयोगाचे प्रकार-उपप्रकार पुढीलप्रमाणे

प्रयोगःव्याख्या व स्वरुप

"वाक्यात कर्ता किंवा कर्म यांच्या पुरुष, लिंग व वचन यानुसार क्रियापदाशी येणाऱ्या संबंधाच्या ज्या वेगवेगळया रचना असतात त्यालाच प्रयोग असे म्हणतात."

प्रयोगविचारात कर्ता, कर्म, क्रियापदाला महत्त्व आहे. कर्ता किंवा कर्म यांच्या लिंगवचन पुरुषानुसार क्रियापदाचे रुप बनण्याच्या किंवा त्यानुसार वाक्यप्रयोग होण्याच्या प्रवृत्तीनुसार प्रयोगाचे प्रमुख तीन प्रकार पडतात. कर्तरी प्रयोग, कर्मणी प्रयोग व भावे प्रयोग. या तीन प्रयोगाबरोबर दामले यांनी संकीर्ण प्रयोग हा एक प्रयोगाचा प्रकार सांगितला आहे.

अ) कर्तरी प्रयोग

- वाक्यातील क्रियापद कर्त्याच्या लिंग, वचन किंवा पुरुषानुसार बदलत असेल तर त्याला कर्तरी प्रयोग म्हणतात.
- क्रियापदाचे रुप कर्त्याच्या लिंग, वचन व पुरुषाप्रमाणे बनलेले असते.

- कर्ता हा नेहमी प्रथमा विभक्तीत असतो.
- कर्त्याला विभक्तीप्रत्यय लागत नाहीत.
- कर्म हे प्रथमा किंवा द्वितीया विभक्तीत असते.
- कर्तरी प्रयोगात शक्यतो साधा वर्तमान काळ असतो.
- भविष्यकालीन वाक्यरचनेत क्रियापद कर्त्याच्या लिंगानुसार बदलत नाही, तर कर्त्यांच्या पुरुष व वचनानुसार बदलतात.

  उदा. कुसुम गावाला जाईल
  रुद्र गावाला जाईल
  मुले गावाला जातील (वचन बदलून)
  तू गावाला जाशील (पुरुष बदलून)

कर्तरी प्रयोगाचे प्रकार -

१. अकर्मक कर्तरी

वाक्यातील क्रियापद कर्त्यानुसार बदलते परंतु त्यात कर्म नसते तेव्हा त्यास अकर्मक कर्तरी प्रयोग म्हणतात.

उदा. तो हळूहळू खातो.
ती हळूहळू खाते.

२. सकर्मक कर्तरी प्रयोग

वाक्यातील क्रियापद कर्त्यानुसार बदलते व त्यात कर्म असते तेव्हा त्यास सकर्मक कर्तरी प्रयोग म्हणतात.

उदा. आई सुदंर स्वयंपाक करते.
बाबा सुंदर स्वयंपाक करतात/करतो.

आ) कर्मणी प्रयोग

- ज्या वाक्यातील क्रियापद कर्माच्या लिंग, वचन किंवा पुरुषानुसार बदलते त्याला कर्मणी प्रयोग म्हणतात.
- कर्म असल्याशिवाय कर्मणी प्रयोग होत नाही.

- कर्म नेहमी प्रथमा विभक्तीत असते.
- कर्ता प्रथमा विभक्तीत कधीच नसतो. तृतीया, चतुर्थी, षष्ठी विभक्तीत किंवा शब्दयोगी अव्ययात असतो.
- शक्यतो साधा भूतकाळ असतो.

कर्मणी प्रयोगाचे प्रकार-

१. प्रधानकर्तृक कर्मणी

- ज्या वाक्यातील क्रियापद कर्माच्या लिंग, वचन किंवा पुरुषानुसार बदलते, परंतु त्या वाक्यात कर्ताच प्रधान असतो.
- कर्त्याला तृतीयेचा (ने/नी) प्रत्यय असतो.
- क्रियापद शक्यतो भूतकाळी असते.

उदा. श्यामने आंबा खाल्ला.
श्यामने सिताफळ खाल्ले.(कर्माचे लिंग बदलून)
श्यामने केळी खाल्ली.(वचन बदलून)

- प्रधानकर्तृक कर्मणी प्रयोगात क्रियापद द्विकर्मक असल्यास त्यातील क्रियापद हे प्रत्यक्ष कर्मानुसार बदलावे कारण अप्रत्यक्ष कर्मानुसार क्रियापद बदलत नाही.

उदा. यशोदेने कृष्णाला लोणी दिले.
यशोदेने कृष्णाला लाडू दिला.

१. गौणकर्तृक कर्मणी

- ज्या वाक्यातील क्रियापद कर्माच्या लिंग, वचन किंवा पुरुषानुसार बदलते आणि त्या वाक्यात कर्ता गौण असतो तेव्हा त्याला गौणकर्तृक कर्मणी प्रयोग म्हणतात.

गौणकर्तृक कर्मणी प्रयोगाचे प्रकार-

१. नवीन/कर्मकर्तरी कर्मणी प्रयोग
२. शक्य कर्मणी प्रयोग
३. समापन कर्मणी प्रयोग
४. प्राचीन कर्मणी प्रयोग

१. नवीन/कर्मकर्तरी कर्मणी प्रयोग

- कर्त्याला ‘कडून’ हा शब्दयोगी अव्यय लागतो.
- वाक्यात क्रियापद संयुक्त असते.
- सकर्मक धातूच्या भूतकालवाचक कृदन्ताला ‘जा’ या सहाय्यक धातूची मदत घेऊन हा प्रयोग करतात.
- इंग्रजीतून मराठीत आल्याने नवीन कर्मणी म्हणतात.
- कर्म प्रथमेत असते.
- क्रियापदाची रुपे बहुधा भूतकाळात असतात.

उदा. त्याच्याकडून पत्र लिहिले जाते.

मांजराकडून उंदीर मारला गेला.

न्यायाधीशाकडून दंड ठोठावण्यात आला.

- जेव्हा वाक्यात कर्माला प्राधान्य देऊन विधान करायचे असते किंवा कर्ता स्पष्ट सांगायचा नसतो किंवा कर्त्याचा उल्लेख टाळायचा असतो तेव्हा कर्मकर्तरी प्रयोग होतो.

२. शक्य कर्मणी प्रयोग

- या प्रयोगातील क्रियापदाचा अर्थ क्रिया करण्याची शक्यता, सामर्थ्य, इच्छा, अपेक्षा असा असतो.
- कर्त्यास तृतीया किंवा चतुर्थी विभक्तीचे प्रत्यय लागतात.
- कर्म हे प्रथमेत असते.
- क्रियापदाची रुपे ही शक्य धातूची असतात म्हणजे मुख्य धातूस व, अव, अवव हे प्रत्यय लागून शक्य क्रियापदे तयार केलेली असतात.

उदा. किरणला पर्वत चढवतो.

३. समापन कर्मणी प्रयोग

- कर्ता षष्ठी विभक्तीत असतो.
- क्रियापद संयुक्त असते.
- वाक्यातील क्रिया पूर्ण झाल्याचे दाखविलेले असते.
-कर्म बदलले की कर्ता बदलतो. अशा स्वरुपाचा बदल केवळ याच प्रयोगात दिसतो.

उदा. सरीताचे पुस्तक वाचून झाले.

सरीताचा ग्रंथ वाचून झाला.

४. पुराण कर्मणी प्रयोग

- हा प्रयोग पद्यात येतो. प्राचीन मराठी काव्यरचनेत सकर्मक धातूला 'इजे' प्रत्यय लावून हा प्रयोग तयार होतो.
उदा. हे नित्य नूतन देखिजे | गीतातत्त्व||

इ) भावे प्रयोग

- जेव्हा क्रियापदाचे रुप कर्त्याच्या किंवा कर्माच्या लिंग, वचन किंवा पुरुषाप्रमाणे बदलत नसून ते नेहमी तृतीयपुरुषी, नपुंसकलिंगी एकवचनी असून स्वतंत्र असते तेव्हा त्याला भावे प्रयोग म्हणतात.
- क्रियापदाचे रुप कर्ता किंवा कर्म यांच्या लिंगवचन पुरुषाप्रमाणे बनलेले नसते.
- क्रियापदाचे रुप स्वतंत्ररित्या म्हणजे तृतीय पुरुषी, नपुसकलिंगी, एकवचनी बनलेले असते.
- भावे प्रयोगात क्रियापद शक्यतो 'ल' किंवा 'व' आख्यातामध्ये असते.
- कर्ता व कर्म कधीच प्रथमा विभक्तीत नसतात.
- कर्म असल्यास ते नेहमी द्वितीया विभक्तीत असते.
- क्रियापदाचे रुप बहुधा भूतकाळी किंवा विध्यर्थी असते.

भावे प्रयोगाचे प्रकार-

१. प्रधानकर्तृक भावे

- या प्रयोगात कर्त्यास प्राधान्य असते.
- कर्त्यास बहुधा तृतीयेचा ने, नी प्रत्यय लागलेला असतो.
- कर्मास द्वितीया किंवा चतुर्थीचा प्रत्यय लागलेला असतो.
- हा प्रयोग सकर्मक किंवा अकर्मक या दोन्ही प्रकारात असतो.

- अकर्मक भावे प्रयोग- क्रियापद शक्यतो विध्यर्थी असते. व त्यात कर्म नसते.
उदा. अमरने जोरात बोलावे.(आज्ञा)

- सकर्मक भावे प्रयोग- कर्ता व कर्म दोघांनाही प्रत्यय असतो.
उदा. गरुडाने सापास पकडले.

२. गौणकर्तृक भावे प्रयोग

ज्या वाक्यातील क्रियापद कर्ता किंवा कर्म यांच्या लिंग, वचन किंवा पुरुषानुसार बदलत नाही व कर्ता गौण असतो तेथे गौणकर्तृक भावे प्रयोग असतो.

गौणकर्तृक भावे प्रयोग प्रकार-

१. शक्य भावे

- या प्रयोगातील क्रियापदाचा अर्थ क्रिया करण्याची इच्छा, अपेक्षा, शक्यता, सामर्थ्य असा असतो.
- कर्ता चतुर्थी किंवा तृतीया विभक्तीत असतो.
- कर्म नसते.
- मूळ धातूस व, अव, अवव हे प्रत्यय लावून शक्य क्रियापदाची रुपे साधलेली असतात.
उदा. ईशाला आता चालवते.

२. समापन भावे

- क्रिया समाप्ती असा क्रियापदाचा अर्थ असतो.
- कर्त्यास षष्ठी विभक्तीप्रत्यय लागलेले असतात.
- कर्म असत नाही. जर कर्म असेल तर त्यास द्वितीया विभक्तीचे प्रत्यय लागतात.
- संयुक्त क्रियापदाचा उपयोग केलेला असतो.
उदा. त्याचे सांगून झाले.

३. अकर्तृक/ भावकर्तृक/ भावकर्तरी भावे

- ज्या क्रियापदाचा कर्ता हा क्रियापदातच गुरफटलेला असतो.
- क्रियेचा मूळ अर्थ किंवा भाव तोच कर्ता मानावा लागतो.
- ही वाक्ये नेहमी अकर्मक असतात.
उदा. इतक्यात सांजावले.
आज दिवसभर गडगडते.

ई) संकीर्ण प्रयोग

कर्तरी, कर्मणी व भावे या तिन्ही प्रयोगांपैकी कोणत्याही दोन प्रयोगांचा संकर होऊन होणाऱ्या प्रयोगास संकीर्ण प्रयोग असे म्हणतात.

१. कर्तृकर्मसंकर = कर्तरी + कर्मणी
- क्रियापदाचे रुप कर्ता व कर्म दोन्हीप्रमाणे बनलेले असते.
- कर्म प्रथमा विभक्तीत.

- कर्ता द्वितीय पुरुषी असेल तेव्हाच हा प्रयोग होतो.

  उदा. तू मला पुस्तक दिलेस.

२. कर्मभावसंकर = कर्मणी + भावे

- कर्ता व कर्म दोन्हीही प्रथमा विभक्तीत.

  उदा. आईने मुलीला निजविले.

३. कर्तृभावसंकर = कर्तरी + भावे

- कर्ता द्वितीय पुरुषी.
- कर्म द्वितीया विभक्तीत.

  उदा. तू मला वाचविलेस.